आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२० डिसेंबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे
- परभणी आणि बीड हिंसाचार प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा
- हरियाणाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौटाला यांचं निधन
- अजमेर-जयपूर राष्ट्रीय महामार्गावर रसायनांनी भरलेल्या ट्रकच्या अपघातात ७ जणांचा मृत्यू, ३३ जण गंभीर जखमी

  **आणि**

- जागतिक पॅरा ॲथलेटीक स्पर्धा पुढच्या वर्षी नवी दिल्लीत

**<><><><><>**

संसदेचं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भात केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आज लोकसभेत गदारोळ केला.त्यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना नियमांचं पालन करण्याचं आणि संसद भवनाच्या प्रवेशद्वारावर आंदोलन न करण्याचं आवाहन केलं. या निर्देशांचं पालन झालं नाही तर कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला. संसदचं पावित्र्य कायम राखणं ही सर्व सदस्यांची संयुक्त जबाबदारी असल्याची जाणीव त्यांनी सर्व सदस्यांना करुन दिली. त्यानंतर गोंधळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली २ विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी मांडला. या समितीमध्ये लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ सदस्य आहेत. भाजपाचे अनुराग ठाकूर, परषोत्तम रुपाला, काँग्रेसचे प्रियंका गांधी, मनीष तिवारी,

तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांच्यासह सुप्रिया सुळे देखील या समितीच्या सदस्य आहेत. यानंतर लोकसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केल्याची घोषणा ओम बिर्ला यांनी केली.

राज्यसभेचं कामकाज सुरू झालं तेव्हा दोन्ही बाजूच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी दोन्ही बाजूच्या सदस्यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला दिला आणि जनतेच्या विश्वासाचा सन्मान करण्याचं आवाहन केलं. पण गोंधळ सुरू राहिल्यानं त्यांनी सुरुवातीला कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर

गोंधळ सुरूच राहिल्यानं त्या गोंधळातच एक देश एक निवडणुकीच्या संदर्भातली २ विधेयकं संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करत असल्याची घोषणा अध्यक्ष धनखड यांनी केली.

**<><><><><>**

भाजपाचे दोन खासदार काल जखमी झाल्याच्या निषेधार्थ राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांनी आज संसद भवनाच्या आवारात आंदोलन केलं. काँग्रेसनं डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा आरोप या खासदारांनी केला. नागालँडमधल्या खासदार फगनॉन कोन्याक यांच्यांशी कथित गैरवर्तन केल्याप्रकरणी राहुल गांधी यांनी माफी मागावी अशी या खासदारांची मागणी होती.

विरोधी पक्षाच्या सदस्यांनीही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ आंदोलन केलं. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल झालेल्या FIR चा त्यांनी निषेध केला.

**<><><><><>**

बीड आणि परभणी इथं गेल्या काही दिवसांमध्ये घडलेल्या घटनांची न्यायालयीन चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. या प्रकरणी विरोधकांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेला ते विधानसभेत उत्तर देत होते. परभणी इथं झालेली घटना कोणत्याही समुदायांमधल्या वैरभावनेतून झाली नाही. या प्रकरणात अटकेत असलेले सोमनाथ सूर्यवंशी यांना श्वसनाचा दुर्धर आजार होता, असंही त्यांनी नमूद केलं. सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा त्यांनी केली.

तसंच या घटनेनंतर मृत्यू झालेले आंबेडकरवादी कार्यकर्ते विजय वाकोडे यांनी या घटनेच्या वेळी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला असं सांगून त्यांच्या कुटुंबालाही पाच लाख रुपयांची मदत फडणवीस यांनी जाहीर केली. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या आणि दगडफेक, जाळपोळ करणाऱ्या ५१ जणांना अटक करण्यात आली असून, या प्रकरणी अतिरिक्त बळाचा वापर करणाऱ्या पोलीस निरीक्षक अशोक घोडबांड यांना निलंबित करून त्यांची चौकशी केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचं प्रकरण तेवढ्यापुरतं मर्यादित नसून याची पाळंमुळं खोदावी लागतील, असं फडणवीस यांनी सांगितलं. संतोष जाधव यांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये मदत देण्याची घोषणा फडणवीस यांनी केली. बीड जिल्ह्यात गुन्हेगारी कारवाया करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, असंही ते म्हणाले.

या प्रकरणाची चौकशी दोन प्रकारे केली जाईल. विशेष पोलीस महानिरीक्षकांच्या अंतर्गत विशेष तपास समिती, तसंच न्यायालयीन चौकशीही केली जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणात पोलीस प्रशासनाची भूमिका कुचराईची असून बीडच्या पोलीस आयुक्तांची बदली करणार असल्याचं फडणवीस यांनी सभागृहाला

सांगितलं. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरानं समाधान न झाल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला.

<><><><><>

हरियाणाचे माजी मुख्यमंत्री तसंच भारतीय राष्ट्रीय लोक दलाचे ज्येष्ठ नेते ओम प्रकाश चौटाला यांचं आज दुपारी गुरुग्राम इथं निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. ५ वेळा हरियाणाचं मुख्यमंत्रीपद भूषवलेले ओम प्रकाश चौटाला माजी उप प्रधानमंत्री देवीलाल चौटाला यांचे सुपुत्र होते. हृदय विकाराचा झटका बसल्यानंतर त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. पण त्यांचे प्राण वाचू शकले नाहीत.

<><><><><>

रसायनांनी भरलेल्या एका मालवाहू वाहनाने दुसऱ्या वाहनाला धडक दिल्यानं लागलेल्या आगीमुळं आज सकाळी राजस्थानातल्या अजमेर जयपूर राष्ट्रीय महामार्गावरच्या भानक्रोटा परिसरात मोठा अपघात झाला. या दुर्घटनेत ७ जण ठार तर ३३ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमी प्रवाशांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल तसंच आरोग्य मंत्री गजेंद्र सिंग खिंवसर यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली असल्याचं सूत्रांनी म्हटलं आहे.

या दुर्घटनेबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही शोक व्यक्त केला असून केंद्र सरकार मृतांच्या नातेवाईकांना २ लाख तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत देणार असल्याचं म्हटलं आहे.

<><><><><>

रायगड जिल्ह्यात ताम्हिणी घाटात आज सकाळी एका खासगी बसला झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला तर १७ जण जखमी झाले. ही बस पुण्याहून

महाडच्या दिशेने लग्नाचं वऱ्हाड घेऊन निघाली होती. या बसमध्ये ३० ते ३५ प्रवासी होते. वाटेत ताम्हिणी घाटातल्या वळणावर चालकाचं नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याची माहिती मिळत आहे. मृतांमध्ये तीन महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. जखमींवर माणगावच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

<><><><><>

पुढच्या महिन्यात होणार असलेल्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आवश्यक असलेली नोंदणीची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून ती १४ जानेवारीपर्यंत उपलब्ध असणार आहे. या कार्यक्रमांतर्गत ६ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी , त्यांच्या पालकांसाठी तसंच शिक्षकांसाठी बहुपर्यायी स्वरूपाची प्रश्नमंजुषा घेण्यात येणार आहे. विद्यार्थीपालक तसंच शिक्षकांचा परीक्षेबाबतचा ताण कमी करणं हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. नोंदणीची प्रक्रिया My gov पोर्टल वर उपलब्ध आहे.

<><><><><>

उत्तर भारतात पडलेल्या दाट धुक्यामुळं तसंच कमी दृश्यमानतेमुळं रेल्वे वाहतुक खोळंबली आहे. त्यामुळं दिल्लीच्या दिशेनं जाणाऱ्या १४ रेल्वे गाड्या उशिरा धावत आहेत. खोळंबलेल्या गाड्यांमध्ये कैफियत एक्सप्रेस, संपर्क क्रांती एक्सप्रेस, गोंडवाना एक्सप्रेस, तेलंगण एक्सप्रेस, शिवगंगा एक्सप्रेस आणि पद्मावती एक्सप्रेसचा समावेश असल्याचं रेल्वेनं म्हटलं आहे.

<><><><><>

विख्यात तबलावादक दिवंगत झाकीर हुसैन यांच्यावर काल सॅनफ्रान्सिस्को इथे अंत्यसंस्कार करण्यात आले. हुसैन यांचं सोमवारी सॅन फ्रान्सिस्को इथल्या रुग्णालयात फुफ्फुसाच्या आजाराने उद्भवलेल्या गुंतागुंतीमुळे निधन झालं होतं.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२० डिसेंबर २०२४ - शुक्रवार

**<><><><>**

भारतात पुढच्या वर्षी २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर  दरम्यान जागतिक पॅरा ॲथलेटीक स्पर्धा होणार आहेत. यासाठी दिल्लीतलं  जवाहरलाल नेहरू स्टेडियम सज्ज झालं आहे. भारतात पहिल्यांदाच होणार असलेल्या या स्पर्धांची ही १२ वी आवृत्ती असणार आहे. जागतिक पॅरा ॲथलेटीक स्पर्धांव्यतिरिक्त ११ ते १३ मार्च दरम्यान जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये पॅरा ॲथलेटीक ग्रँड प्रिक्स स्पर्धाही होणार आहेत.

**<><><><>**

महिलांच्या टी-२० क्रिकेटमध्ये काल नवी मुंबईच्या डी. वाय. पाटील मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात भारतीय संघाने वेस्ट इंडिजचा ६० धावांनी पराभव करत मालिका २-१ ने जिंकली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताच्या स्मृती मंधानाने ७७ तर ऋचा घोषने ५४ धावा केल्या. या धावांच्या बळावर भारताने २० षटकांत ४ बाद २१७ची मजल मारली होती. ही भारतीय महिला संघाची आजवरची सर्वोच्च धावसंख्या आहे. या धावांचा पाठलाग करताना विंडीज संघाला २० षटकांत ९ बाद १५७ धावा करता आल्या.

भारताकडून राधा यादव हिने चार गडी बाद केले. ऋचा घोषने महिलांच्या टी-२० क्रिकेट प्रकारात आजवर सर्वात वेगवान अर्धशतक करण्याच्या विक्रमाशी बरोबरी केली. तिने अवघ्या १८ चेंडुंत ५० धावा केल्यामुळे तिला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं तर स्मृती मंधाना मालिकावीर ठरली.

**//<><><><>//**